RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# परिवर्तनवादी चळवळ आणि दलित नाटकातील संघर्षप्रवणता

## (‘वाटा पळवाटा’ व ‘किरवंत’ च्या अनुषंगाने)

**बाळकृष्ण बंडू जाधव**

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,

चंद्राबाई-शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,

ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

मोबा : ८००७८०२२७८

## प्रास्ताविक

केवळ महाराष्ट्राच्याच नव्हें तर भारताच्या सर्वंकष सामाजिक क्रांतीचे जनकत्त्व आधुनिक कालखंडात क्रांतीबा जोतीराव फुले यांना द्यावे लागते. वैदिक धर्मग्रंथाची परखड चिकित्सा, स्त्री-शुद्रादिकांची कैफियत, वर्ण-जाती विषमतेविरूध्दचा कृतीशील संघर्ष, ललित व तात्विक ग्रंथ लेखन, सत्यशोधक समाजाची स्थापना व शिक्षणातून समाजपरिवर्तनाचे त्यांनी अंगीकारलेले सूत्र हेच सामाजिक क्रांतीकारी चळवळीचे उर्जास्त्रोत राहीले. पुढे राजर्षी छ. शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ते कर्मवीर भाऊराव पाटील या लोकोत्तर महामानवांनी ‘शिक्षण’ हे समाजपरिवर्तनाचे साधन मानून महाराष्ट्राला पुरोगामी चेहरा दिला म्हणून सामाजिक परिवर्तनवादी चळवळींचा उगम म्हणजे महात्मा जोतीराव फुले - राजर्षी शाहू - डॉ. बाबासाहेब आंबेडकर या त्रयींच्या कृतीशील तत्त्वज्ञानाचा परिपाक होय !

या क्रांतीशील चळवळींचा आरंभबिंदू हा क्रांतीबा जोतीराव फुले हेच होत. हे मराठी ग्रंथकार सभेस, दि. ११ जून १८८५ रोजी ‘ज्ञानोदय’ मधून त्यांनी लिहीलेल्या पत्रावरून सिध्द होते. या पत्रात ते म्हणतात -

‘‘... यापुढे आम्ही शुद्र लोक, आम्हांस फसवून खाणाऱ्या लोकांच्या थापांवर भुलणार नाहींत. सारांश, त्यांच्यात मिसळल्याने आम्हां शुद्रादि अतिशुद्रांचा कांही एक फायदा होणे नाही, याबद्दल आमचा आम्हीच विचार केला पाहिजे. अहो, त्या दादांना जर सर्वांची एकी करणे असेल, तर त्यांनी एकंदर सर्व मानवी प्राण्यात परस्पर अक्षय बंधूप्रीती काय केल्याने वाढेल, त्यांचे बीज शोधून काढावें व ते पुस्तकाद्वारे प्रसिध्द करावे.’’[१]

राजर्षी छ. शाहू महाराजांनी सांगितले की, अस्पृश्यता निमुर्लनाचे कार्य हे अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य नसून राष्ट्रीय उध्दाराचे कार्य आहे .... कोणत्याही वर्ण-जातीतील व्यक्तींना कधी ना कधी जाती विषमतेच्या विषारी वेलीच्या मंडपा खालून जावेच लागेल ... बहुजनातील शिकलेल्या पुढाऱ्यांनी जाती संघटना काढा पण जाती संघटन हे जाती मजबूत करण्यासाठी नसून जाती मोडण्यासाठी आहे हे लक्षात ठेवा !

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार-कृतीशीलतेमुळे आणि ‘बौद्ध धम्म’ स्वीकारामुळे दलित समाजात नवचैतन्य पसरले ‘शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा’ या महान संदेशाने दलित तरूणांना शिक्षणाचे महत्त्व पटले. प्रज्ञेच्या दिव्यत्त्वाने प्रज्ज्वलीत झालेल्या या पिढीने वर्णधर्म-जातीश्रेष्ठत्त्वाच्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

विषमतावादी आवर्तनातून मुक्ती मिळवण्यासाठी वेदना, विद्रोह व नकार हे सूत्र घेवून, स्वातंत्र्य, समता, मानवता, बंधुता आणि विज्ञाननिष्ठ विवेकवाद या मूल्यनिष्ठ नवसमाज-रचनेसाठी दलित साहित्याची निर्मिती केली. कविता, आत्मकथन, कथा, कादंबरी व नाटक या वाङ्मय प्रकारानी दलित साहित्याने मराठी साहित्यात अस्मितादर्शी ओळख निर्माण केली. त्यापैकी दलित नाटक-रंगभूमीने दलित चळवळीला मोठं बळ दिले. म्हणून दलित रंगभूमीचा चळवळीच्या अनुषंगाने विचार करणे गरजेते ठरते.

## पार्श्वभूमी

मराठी रंगभूमी सदैव मराठी मध्यमवर्गीय माणसांच्या हाती राहीली त्यामुळे मध्यमवर्गीय जाणिवा, बुध्दिजीवी असण्याचा गंड, क्वचित बंडखोरी, इतर वर्गापासून राखलेलं आंतर व आत्मलुब्धता या लक्षणामुळे मराठी रंगभूमी थेट वास्तवाला न भिडता कौटुंबिक व पुरूषवर्चस्ववादी, ब्राह्मणी मूल्यांचं चऱ्हाट लावत आणि बऱ्याचदा स्वप्नरंजनात मश्गुल राहीली असा अभिप्राय नोंदवत १९९० पूर्वीचं नाटक ‘स्वत:च्या कोषात रमलेलं नाटक होतं’’[२] असे मत नाटककार व नाट्यसमीक्षक जयंत पवार यांनी मांडले आहे. अशा आत्मकोषी प्रस्थापित रंगभूमीला पर्याय दिला तो दलित रंगभूमीने.

१९७४ ची दलित पॅन्थरची स्थापना आणि गतीमान, आक्रमक व निर्भय बनलेली दलित चळवळ यांचा दलित नाट्य चळवळीशी अन्योन्य संबंध आहे. अन्याय व अभावग्रस्त असलेल्या दलित समाजास रस्त्यावरचा न्यायीक संघर्ष करण्याची आत्मनिर्भरता ‘पॅन्थर’ मुळेच प्राप्त झाली. नागर व ग्रामीण भागात दलित संघटन व चळवळ उभी राहीली त्यामुळे लढवय्ये नायक व संघर्षप्रवणता दलित नाटकात अविष्कृत होताना दिसते (प्रा. दत्ता भगत सारख्या सयंमी नाटककाराला सुध्दा पॅन्थर व मासमुहमेंट या संघटनाचे आकर्षण होते) परिणामी १९८० नंतर आत्मशोध, अनुभवांचा जीवंतपणा, सामाजिक संदर्भ व आंबेडकरी तत्त्वज्ञानाची शक्ती घेवून संघर्षप्रवण नाटके मराठी रंगभूमीवर अवतरली.

काळोखाच्या गर्भात (१९८१), थांबा रामराज्य येतय (१९८२), इथे माणसाला स्थान नाही (प्रयोग १९८१), साक्षीपूरम (१९८२), आम्ही देशाचे मारेकरी (१९८२), तनमाजोरी (१९८५), जय जय रघुवीर समर्थ (१९८५), वाटा पळवाटा (१९८८), किरवंत (१९९१) इ. नाटकामुळे दलित रंगभूमीचा वेगळा प्रभाव मराठी रंगभूमीवर प्रकर्षाने जाणवू लागला. ही घटना सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची ठरते. कारण ‘‘मराठी नाटकांच्या इतिहासातील हा दलित नाटकांचा प्रवाह अविभाज्य भाग आहे. हा दलित नाट्यचळवळीचा नवोन्मेष प्रवाह म्हणजे नाविण्याचा, नवसमाज जाणिवांचा एक नवा आकृतीबंध आहे.’’

कालोघात अश्मिभूत झालेली संस्कृती अथवा समाजजीवन नाटकाचा विषय होत नाही पण पौराणिक, ऐतिहासिक किंवा भूतकालीन सामाजिक-सांस्कृतिक संदर्भाविषयांना वर्तमानाशी जोडण्याचे अभूतपूर्व सामर्थ नाटकात दडलेले असते त्यामुळे बहुदा नाटक हे इतर कोणत्याही वाङ्मय प्रकारापेक्षा वर्तमानाशी जास्त सुसंवादी असते, या जणिवेतून दलित रंगभूमीने वर्तमानाशी सांधा जोडला. दलित नाटकांचा जन्म चळवळीतून झाल्याने, वर्तमान समाजव्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून समाताधिष्ठीत ‘नवसमाजनिर्मिती’ हे दलित रंगभूमीचे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

ध्येय आहे. प्रस्थापित परंपरेला नकार देवून अमानवी रूढी-प्रथाविरूध्द विद्रोह करून समाजप्रबोधन करण्यासाठी दलित नाटककारांनी नाटकांस सामाजिक क्रांतीचे अस्त्र बनविले.

## दलित नाटक व रंगभूमी

लोकपरंपरेतील तमाशा, सत्यशोधक व आंबेडकरी जलसे, या पूर्वपरंपरेतून दलित नाटकांचा उदय झाला. शोषित, अभावग्रस्त माणसांच्या समस्या घेवून बुध्दिप्रामाण्यवादी दृष्टीकोनातून धर्मांध व अमानवी प्रवृत्तीविरूध्द संघर्ष करण्यासाठी, वैचारीक मंथन व प्रबोधनासाठी आधुनिक दलित नाट्य चळवळ कार्य करू लागली.

दलित नाटक ही संज्ञा स्पष्ट करताना प्रा. रामनाथ चव्हाण म्हणतात - ‘‘दलित नाटकं विद्रोही आहेत पण ती या मातीशी द्रोह करणारी नाहीत. ती कडवट आहेत, पण कटुसत्य सांगणारी आहेत ती विदारक आहेत; अवास्तव नाहीत त्यांच्या निर्मिती लेखनामागे इथल्या समाजाबद्दलच्या, जातीव्यवस्था मोडण्याचा आणि राष्ट्राच्या एकात्मतेचा विचार आहे.’’[४]

हेतूहिन व रंजनप्रधान नाटकापेक्षा विद्यार्थ्यांनी जीवनानुभव व समस्या विषयीची नाटके सादर करावीत हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश घेऊन प्राचार्य म. भि. चिटणीस यांनी युगयात्रा (१९५५) हे नाटक लिहीले आणि औरंगाबाद येथील मिलींद महाविद्यालयाच्या ‘नागसेनवन’ या परिसरात त्याचा पहिला प्रयोग झाला, तोच दलित रंगभूमीचा आरंभ बिंदू होय.

दलित रंगभूमीचा उदय रंजनासाठी नव्हे तर प्रबोधन व वर्ग-वर्णव्यवस्थेविरूध्द संघर्ष करण्यासाठी झाला. दलित, शोषित उपेक्षितांचे विश्व उलघडून दाखवून दलित बांधवात ऐक्य साधणे व बुद्ध - फुले - आंबेडकरवादी विचार जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी झाला.

## दलित नाटकातील संघर्ष चित्रण

दलित नाटकांनी अंधश्रध्दा, दैववाद, जातीयता यावर कठोर प्रहार केले. भौतिक व विज्ञानवादी दृष्टीकोनातून धर्म-रूढीप्रथांची चिकित्सा केली. ‘माणूस’ आणि मानवी जीवनाविषयक मूल्यांची जपणूक करून, समता, मानवता, बंधुता व स्वातंत्र्य या चतु:सूत्रीच्या आधारे नवसमाज निर्माण व्हावा यासाठी सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर संघर्ष केला.

जे जे अन्यायग्रस्त आहेत त्या त्या शोषित समाजाची दु:ख मांडणे, शोषितांत ऐक्य साधणे व ज्या धर्मग्रंथी संस्कृतीने हे वेदनामय जग भोगायला लावले त्या संस्कृती व प्रस्थापिताविरूध्द संघर्ष करणे - ही कृती दलित लेखकास करावी लागते त्याचवेळी ज्या प्रस्थापितानी शेकडो वर्षे अन्याय केला त्यांनाच अंतर्मुख, चिंतनशील करून प्रज्ञाशील व कारूण्यमयी बनवण्याची किमया नवसमाजरचनेसाठी साधावी लागते. म्हणून दलित नाटकातील संघर्ष हा दलित विरूध्द सवर्ण व्यक्ती किंवा समूह यांच्या विरूद्धचा संघर्ष नसतो तर तो

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

वैचारिक वा सांस्कृतिक पातळीवरचा असतो. हा संघर्ष, चीड, संताप, रक्तपात व भेदासाठी नसून बंधुत्त्वासाठी असतो.

## ‘वाटा पळवाटा’ - दत्ता भगत

दलित चळवळ आणि तीन विढ्यातील वैचारिक व कृतीशील पद्धतीमध्ये कालोघात घडत जाणाऱ्या राजकीय बदलाचे संघर्षचित्रण प्रा. दत्ता भगत यांच्या ‘वाटा पळवाटा’ या नाटकात वास्तवदर्शीपणे प्रकट झाले आहे. तीन ही पिढ्या आंबेडकरी तत्त्वज्ञानाच्या पाईक असल्या तरी त्यांच्या आचारधर्मात असणाऱ्या फरकाचे सूक्ष्मदर्शी चित्रण या नाटकात येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत कृतीशील कार्यकर्ता म्हणून केलेल्या काकांची व्यक्तिरेखा आंबेडकरी चळवळीच्या उगमाची साक्षीदार आहे. शेकडोवर्षाची धर्मबेडी तोडताना जातीयविषमतेविरूध्द करावा लागलेला  संघर्ष, गावबंदी, कामबंदी करून प्रस्थापितानी दलितांना बहिष्कृत केल्यावर, वाड्यावस्त्या जाळल्यावर कड्याकपारीत दडून पोटात भूकेचा आगडोंबर उसळला, हालापेष्टा सहन कराव्या लागल्या तरी आत्मसन्मानासाठी उभारलेला  लढा, जातीची कात टाकून पुन्हा बौध्दधम्म स्वीकारानंतर प्राप्त झालेला नवा जीवनानुभव घेत जगणारे काका म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेला पहिला हादरा देणाऱ्या आंबेडकरी चळवळीचा शिलेदार होत !

स्वातंत्र्यपूर्व काळखंडातील दलितांच्या दैन्य, दास्य दारिद्रयता व व्यथा वेदनेचे व माणूस म्हणून जगण्यासाठी भयमुक्त संघर्षप्रवण बनत चाललेल्या दलितांच्या विश्वाचे ऐतिहासिक दर्शन काका या व्यक्तिरेखेद्वारे उलघडत जाते.

बौध्द महासभा, बौध्द विहाराची स्थापना, धम्मग्रंथाचे पारायण, दलित पूरग्रस्ताना मदत मिळावी म्हणून अर्जून सारख्या नव्या उमेदीतल्या तरूणास काकांनी दिलेला पाठिंबा, दंगलीच्या काळात कायद्याची भाषा बोलणाऱ्या पुतण्या प्रा. सतिश गोडघाटेंना ‘कशासाठी शिकवला तूहा ?’ असा केलेला खडा सवाल. काकाच्या सामाजिक अत्मियतेचे भान प्रकट करतो. समाजासाठी झटले पाहिजे या ध्येयाने पछाडलेल्या काकाचे  जीवन म्हणजे एक स्वतंत्र संघर्षपटच आहे.

दलित-सवर्णाच्या दंगलीत शेवतांचा मृत्यु होतो. बुद्धमूर्ती स्थापना संदर्भाने अर्जून-काका यांच्यात वाद होतो सत्तेच्या राजकारणामुळे दलित समाज व दलित चळवळीची फाटफूट होताना त्यांनी पाहिलेले असते त्या दु:खाची सल त्यांच्या हृदयात बोचत असते. पण अर्जून जाधव या तिसऱ्या पिढीतील दलित तरूणाकडूनही काकांचा भ्रमनिराशा होतो. काका हताश हतबल होतात आंबेडकरी चळवळीच्या सच्चा पाईकाची प्राणनिष्ठता, आत्मियता प्रत्येक रसिकाला अंतर्मुख बनवते.

प्रा. सतीश गाडेघाटे सेवादलात वाढलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाची व कार्याची ज्ञानात्मक ओळख झालेली प्रज्ञावंत व्यक्तिरेखा होय. दलित समाजास हक्क-अधिकार मिळाले पाहिजेत, त्यांच्या व्यथा वेदनांना न्याय मिळाला पाहिजे पण समस्या सोडवताना कायद्याच्या चौकटीत राहूनच सोडवल्या

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

पाहिजेत. सवर्ण लोक कायद्याचा आधार घेऊन पिळवणूक करतात दलित पूरग्रस्ताना घरे मिळू नयेत म्हणून खेळी करतात म्हणून आपण आक्रस्ताळे, अतिरेकी बनू नये. असा अर्जून व काकांना सल्ला देणारा. बौद्धिक विचारातच गुंतून पडलेल्या दुसऱ्या पिढीतील दलित शिक्षित नोकरदारांचे प्रतिरूपदर्शन प्रा. सतीश गोडघाटेंच्या रूपाने घडते जातीय मानसिकतेतून अर्जून जाधवला दंगलीच्या कारणावरून कॉलेजमधून काढून टाकण्याच्या प्रसंगी प्रा. सतीश गोडघाटेंचा संघर्ष, पूरग्रस्तांच्या प्रकरणातील सवर्णाचा काबेबाजपणा ओळखून संदेश देणारा, बौद्धिकता, चारित्र्य व स्पष्ट भूमिकेमुळे समाजात प्रतिष्ठा प्राप्त झालेला सतीश गोडघाटे आक्रमक दलित तरूणांना परका वाटू लागतो. पॅन्थर आणि मासमुहमेंटच्या विचारधारेच्या संघर्षाचा परिपाक या संघर्षात स्पष्ट दिसू लागतो.

अर्जून जाधव हा महाविद्यालयीन नव तरूण गरीबीतून शिक्षण घेत दलित चळवळीत सक्रिय सहभागी होणारा आक्रमक, निर्भिड व कृतीशील कार्यकर्ता असतो. प्रा. सतीश गोडघाटे, हेमा, काका यांच्या संपर्काने त्याला बौद्धिक आणि कृतीशील होण्यास आत्मबळ मिळते. त्याच्या हरहुन्नरी, समाजाभिमुख वृत्तीमुळे सोनल (दासराव जोशींची मुलगी) प्रेम करू लागते. त्याप्रसंगाची जाणीव नसणाऱ्या अर्जून जाधवचा अपमान दलितमित्र दासराव जोशी करतात या अनुभवाने आक्रमक बनलेला अर्जून हा जातीय विषमतेचा कटूअनुभव घेऊन अधिक आक्रमक होतो. दंगलीच्या काळात शेवतांचा होणाऱ्या मृत्यूस त्याला जबाबदार धरले जाते तेव्हा प्रा. सतीश, अर्जून व काका यांच्यातील संघर्ष हा तीन पिढ्यातील वैचारिक भूमिकेतील बदलाचे स्वरूप स्पष्ट करतो.

वाटा पळवाटा या नाटकात एका बाजूस दलितांना उघड वा छुप्या स्वरूपातील सवर्णांच्या जातीयवादी संघर्षात होरपळावं लागते तर दुसऱ्या बाजूस दलितांमधील मतभिन्नतेचा संघर्ष अनुभवावा लागतो. दलित माणूस भरडला जातो व प्रतिनिधी वाटा-पळवाटा शोधत राहातात. याचे विदारक चित्रण वाटा पळवाटा मधून घडते.

## ‘किरवत’ प्रेमानंद गज्वी

कोणताही माणूस मी माझा समाजच मानतो ही प्रेमानंद गज्वीची माणसाकडे पाहाण्याची व्यापक जीवनदृष्टी त्यामुळे माणसाचं रोजच जगणं व समाजाचे कळीचे मुद्दे मांडणं हे कलावंताचं काम असतं असं ते मानतात.

धर्मसंस्कृतीच्या नावाखाली समाजाचे विषमतेच्या पायावर क्रूरतेनं विभाजन केले. माणसात बुद्धीभ्रम, पसरवून बुद्धीभेद करणं हे माणसांना शहानं न होऊ देण्याचं कट कारस्थान आहे. अशा स्वार्थी, असहिष्णुतावादी प्रवृतीविरूध्दचा संघर्ष ‘किरवंत’ या नाटकातून चित्रित केला आहे. एका विशिष्ट जाती चौकटीत बंदिस्त न होता धर्माधिष्ठित विषमतावादी व्यवस्थेविरूध्द क्रांतीप्रवण होण्याचं तत्व प्रेमानंद गज्वीनी अंगीकारले. ही कृती म्हणजे आंबेडकरी विचार धारेचा परिपाक होय !

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

धर्मपरंपरेत वर्णाश्रमव्यवस्थेमध्ये सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या ब्राह्मण वर्गातही अंत्येष्ठी आणि मृतांची कर्मे करणाऱ्या 'किरवंत' या ब्राह्मण वर्गास अस्पृश्यतेच, विषमता, व बहिष्कृततेचं अपमानीत जीवन कसे जगावे लागते याचे कारूण्यदर्शन 'किरवंत' या नाटकातून घडते.

अंतेष्ठी किंवा मृताची विधिकर्मे करणे म्हणजे माणसाच्या मृत्युनंतर आत्म्याला मुक्ती देण्याचे पवित्र 'पुण्यकर्म' करण्याचे सद्भाग्य किरवंताना लाभले आहे या जाणिवेनं किरवंतांचा सेवाधर्म पाळणारा सिद्धेश्वरशास्त्री जोशी ही व्यक्तीरेखा म्हणजे केवळ विषमतेच्या जोखडात पिचलेल्या समाजाचं प्रतिक नसून हिनकर्माना पुण्यकर्म मानून शारीरिक व मानसिक गुलामीत धन्यता मानणाऱ्या धर्मभोळ्या शोषितांचा प्रतिनिधीच म्हणावे लागते. सार्वजनिक ब्राह्मणसभेने आयोजित केलेल्या सत्यनारायणाच्या महापूजेतून दिगंबर शास्त्राने 'किरवंत' असल्यामुळे सिद्धेश्वरास हाकलून दिले तरी त्या विरूध्द तो 'ब्र' शब्द ही न बोलता निघून येतो तेव्हा या अपमानीत जगात वावरणाऱ्या सिध्देश्वरास त्याचा भाऊ वासुदेव म्हणतो -

''ब्राह्मण धर्माला शोभेशी संध्या करतो असं तूला वाटतं पण लोक तूला ओळखतात ते स्मशाणातील कर्मे करणारा किरवंत म्हणून. जातीनं ब्राह्मण, पण कर्मानं अधम किरवंत, कोणत्याही शुभकार्यात शुद्राचं आगमन जसं वर्ज्य तसंच तूझही. ब्राह्मण धर्मात कायस्थान आहे तूला ? काल झालेल्या सत्यनारायणाच्या महाप्रसादाच्या पूजेचा प्रसाद विसरलास ? दिगंबर शास्त्रानं चालतं हो म्हणताच तोंडातून 'ब्र' ही न काढता चालू लागलास ?''

या विद्रोही भूमिकेतून वासुदेव सिद्धेश्वरास जागृत करण्याचा प्रयत्न वेळोवेळी करत राहातो. पण पुर्वजांचे किरवंताच काम मला निष्ठेनं केलंच पाहिजे. नाहीतर नरक यातना मला मृत्यूनंतर भोगाव्या लागतील. मी हे काम टाळायचा विचार केला तरी मला चित्र विचित्र स्वप्नं पडतात अशी भयावह अवस्था तो सांगत राहातो.

हिंदूत्ववादी संघटनेत काम करणारा बंडखोर वासुदेव शेवटी भावाला वेदान्तशास्त्राच्या आईचे अंत्यविधी कर्मे करू देत नाही, तेव्हा ब्राह्मण वर्गाला ते धर्म संकट वाटते व संघर्षाला खरी सुरूवात होते शिक्षा म्हणून सिध्देश्वर शास्त्रीच्या कुटुंबावर सर्वांगीण बहिष्कार, वासुदेवाला ठार मारण्याचा प्रयत्न व बहिष्काराने दारिद्र्य गरीबी, उपासमार व नारायणशास्त्राच्या घरी मधूस मिळालेली अस्पृश्यतेची वागणूक या घटनाप्रसंगातून हे नाटक संघर्ष व कारूण्यतेच्या पातळीवर वेगळी उंची गाठते - शेवटी चित्रविचित्र स्वप्ने पडून, मानसिकदृष्ट्या खचून ब्राह्णण्यवादाविरूध्दच्या संघर्षात बंड न करता पिचून गेलेल्या सिध्देश्वराचा होणारा मृत्यू चटका लावून जातो.

शेवटी रेवती मधूच्या हाती अंत्यविधी कर्माची पोथी ठेवताना हताश होणारा वासुदेव अंतिम लढाईत काहीच करू शकत नाही असा नाट्यत्मक कलाटणी न देणारा शेवट या नाटकाचा केला आहे.

संघर्षात पराजित होणारा, सून्न होणारा नायक वासुदेव हा व्यवस्थेला शरण गेल्याचं गज्वीनी दाखवलेबद्दल डॉ. मधूकर मोकाशी म्हणतात, ''नाट्याशयाला मारक असणारे हे कथानक होय. शेवट पाहिल्यानंतर इतर नाटकाप्रमाणे बंडखोरीचा विजय परिवर्तनाच्या लढाईला हातभार लावणारे असाच

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

दाखवायला हवे होते. एरवी गज्वींच्या नाटकात दलित नाटकाच्या शेवटी गावकीची कामे केलेली किंवा दलितांचा पराभव झालेला दाखविला आहे काय ?''[५] असा 'किरवंत' या नाटकाचा शेवटच्या बाबतीत डॉ. मधुकर मोकाशी यांनी तक्रार नोंदवलेली आहे व प्रा. म. द. हातकणंगलेकरानी या नाट्यसंहितेच्या प्रारंभी 'दोन शब्द' मध्ये मांडलेले मत त्यांना पटत नाही. पण 'किरवंत' या नाटकाकडे इतक्या उथळपणे पाहूच चालत नाही.

प्रेमानंद गज्वीनी या नाटकामध्ये ब्राह्मण वर्णात अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या 'किरवंत' या जातीचा ते वंचित, शोषित जीवनपट साकारतात. किरवंत जातीत जन्मलेला वासुदेव हा या ब्राम्हणवादाविरूध्द निकराचा संघर्ष करीत असला तरी त्याच्या बंडखोर, विद्रोही प्रवृत्तीस समताधिष्ठित आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान नाही कारण वासुदेव म्हणजे संघप्रणित हिंदूत्ववादी चक्रव्युहात गुरफटलेला अभिमन्यू आहे. या धर्मात तुम्ही स्वत:ला कोण समजून वागता ही गोष्ट महत्त्वाची नसून, तुमच्या जन्माधिष्ठित वर्ण-जातीला धर्म व्यवस्थेत काय स्थान आहे यावर त्या व्यक्ती अथवा वर्ण-जातीची प्रतिष्ठा सिद्ध होत असते. विषमतावादी वर्णश्रम व्यवस्था हे ज्या धर्माचं अंगभूत तत्त्व आहे त्या धर्मात गुरफटलेल्या तरूणाला परिवर्तनाच्या लढाईत पराजित व्हावं लागतं. तात्पर्य, बुध्द - फुले - शाहू - आंबेडकरवाद हेच समताधिष्ठीत 'नवसमाज निर्मिती' साठी पोषक तत्त्वज्ञान आहे मानव मुक्तीच्या लढ्याचं ते प्रभावी अस्त्र आहे याची जाणीव 'किरवंत' या नाटकाद्वारे प्रेमानंद गज्वी करून देतात. याद्दष्टीने 'किरवंत' नाटक संघर्षमयी शोकत्मिकता असून सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याचा दिशादर्शक दस्ताऐवज आहे.

## समारोप

प्रारंभी दलित रंगभूमीने महात्मा जोतीराव फुले - राजर्षी छ. शाहू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या त्रयींचा विचार बहुजनांपर्यंत पोहचत असताना सत्यशोधक व आंबेडकरी जलसाच्या माध्यमातून पोहचवला; कारण तत्कालीन दलित-शोषित समाज हा निरक्षर, अशिक्षित, परंपरेत जखडलेला, अज्ञानी होता. अशा वर्गास क्रांतीसन्मूख बनवण्यासाठी लोककलारूप 'जलसा' हा चळवळीला उपयुक्त ठरला तर शिक्षणाने, धम्मानुकरणाने प्रज्ञावंत बनलेल्या पॅन्थर, मास मुहमेंट सारख्या चळवळीने आत्मनिर्भर बनलेल्या दलित तरूणांनी दलित नाटके लिहून मराठी नाट्य क्षेत्रात मोलाची भर घातली. केवळ दलितांसाठी नव्हे तर सर्वंकष सामाजिक क्रांतीसाठी समाजात वैचारिक मंथन, प्रबोधन व्हावे यासाठी दलित नाटक व रंगभूमीने दिलेले योगदान महत्त्वाचे आहे. पण नाटक ही प्रयोगरूप कला असून प्रयोगाशिवाय नाटक समाजापर्यंत पोहोचत नाही. त्यामुळे साधन सामग्रीची अपूर्णता, नाट्य संस्था, प्रेक्षक हा शहरी मध्यमवर्गातून येत असल्याने, डाव्या चळवळी क्षीण होत गेल्याने, आंबेडकरी चळवळीची फूट, इ. गोष्टी दलित रंगभूमीला मारक ठरल्या म्हणून आजच्या स्थितीत दलित नाटक जीवंत असलं तरी दलित रंगभूमिला मरगळ प्राप्त झाली आहे.

## संदर्भ सूची

१. संपादक : कीर धनंजय, मालशे स. ग., डॉ. फडके य. दि.
महात्मा फुले समग्र वाङ्मय (शासकिय प्रत) सुधारित सहावी आवृती - नोव्हें. २००६.

२. पवार जयंत, 'वास्तव कवेत घेणाऱ्या नाटकांचा काळ' (लेख)
'पुण्यभूषण' (स्मरणिका) सन २०१०.
८३ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन, पुणे.

३. तत्रैव.

४. प्राचार्य डॉ. शिरसाठ शिवदास,
दलित नाटक आणि दत्ता भगत यांचे नाट्यविश्व.

५. डॉ. मोकाशी मधुकर,
दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ,
स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती - जानेवारी २०००.